# टी वाय. बी. ए. - जी- ३

# ग्रंथपरीक्षण – घटक -१

## ग्रंथपरीक्षण स्वरूप आणि चिकित्सा

प्रा. तुकाराम भवर

# ग्रंथपरीक्षण स्वरूप आणि चिकित्सा :

'ज्या प्रक्रियेत ग्रंथाची थोडक्यात, आटोपशीर, सर्वांगीण ओळख होते, अर्थप्रतीती प्राप्त होते त्यास ग्रंथपरीक्षण म्हणता येईल. ग्रंथातील भावसौंदर्य, विचारकल्पना यांचा आस्वाद व मूल्यमापन ग्रंथपरीक्षणात अभिप्रेत आहे; पण त्यासाठी ग्रंथाचे वाचन व परीक्षण विवेकपूर्ण - आस्वादक पद्धतीने होण्याची गरज आहे. ग्रंथातील सौंदर्याचे यथार्थतेने ज्ञान करून घेणे, रसिक वाचकांना ग्रंथ वाचण्यास प्रवृत्त करणे व त्यांच्या अभिरुची उन्नत करणे या गोष्टी ग्रंथपरीक्षणात प्रमाणभूत मानण्यात येतात. कवी, लेखकाचे व्यक्तिमत्त्व, स्वभावविशेष, प्रतिभासामर्थ्य यासह ग्रंथाचे वेगळेपण, सामर्थ्य, मर्यादा यांचे मर्म उलगडून दाखविणे हे ग्रंथपरीक्षकाचे कार्य होय!

ग्रंथपरीक्षणात कवी, लेखकाच्या मन:स्थितीचा शोध घेताना, ग्रंथलेखनाविषयी त्यांची भूमिका, उद्दिष्टे व प्रेरणा समजावून घेता येते. कलाकृतीतील सौंदर्यतत्त्वाचे विश्लेषण करणे, यासह संबंधित कवी, लेखकाला व सामान्य वाचकालाही मार्गदर्शन करण्याची प्रक्रिया ग्रंथपरीक्षणात अभिप्रेत असते.

# ग्रंथपरीक्षणाची उद्दिष्टे :

१) साहित्यकलाकृतीचा आस्वाद घेताना त्यातील अंतरंग, कथानक, भावसौंदर्य, तत्त्वविचार, जीवनदर्शन, व संबंधित कवी-लेखक ग्रंथकाराची कला व जीवनविषयक जाणिवा विशद करणे, याशिवाय दुसऱ्या बाजूने ग्रंथकाराच्याउणिवा, मर्यादा, त्रुटी, विसंगती, प्रमाद, दोष, सद्भावनेने दाखविणे व योग्य तो अभिप्राय देणे म्हणजे ग्रंथपरीक्षण असे सामान्यपणे म्हणता येईल.

# ग्रंथपरीक्षणाची उद्दिष्टे :

२) साहित्यकलाकतीचे अवलोकन-विश्लेषण करणे. ग्रंथकाराचे व्यक्तिमत्त्व वत्याच्याशी संबंधित स्थळकाळाचे अवलोकन करणे, कलाकृतीतील सौंदर्याचा. मध्यवर्ती आशय-विषय शोधन, त्यातील भावानुभावाशी समरस होणे महत्त्वाचे ठरते. उदा. 'ज्ञानेश्वरी' तील आशयाचे व आविष्काराचे, विविध विषयांचे मर्म उलगडून दाखवणे व त्यावर आणखी ग्रंथलेखन करणे, संशोधन करणे. यासारखा दुसरा आनंद नाही.

# ग्रंथपरीक्षणाची उद्दिष्टे :

- ३) ग्रंथकाराच्या आशयाशी समरस होताना ग्रंथपरीक्षकाने स्वत:चे वेगळेपण जपले पाहिजे. यानंतर ग्रंथकाराचा ग्रंथलेखनाचा हेतू विशद करून तो कितपत साध्य झाला यावरही मतप्रदर्शन करणे योग्य ठरते.
- ४) ग्रंथकाराने स्थळ-काळाचे भान राखन केलेले लेखन त्या वेळची त्याची मनःस्थिती यांचाही अनुभव ग्रंथपरीक्षणामध्ये घेऊन त्याविषयी सहानुभूतीने मत प्रदर्शन करावे! पण त्यासाठी पूर्वग्रह कोणतेही नसावेत! म्हणजेच ग्रंथपरीक्षणात उथळ, पूर्वग्रहदूषित वृत्तीचा अभाव पाहिजे..
- ५) ग्रंथपरीक्षणासाठी वाङ्मयीन मूल्ये, जीवनमूल्ये, कवी - लेखकाचे चरित्र, व्यक्तिविशेष यांविषयी माहिती घेऊन ग्रंथातील अर्थग्रहण व्हावे, रसास्वाद नेमकेपणाने घडण्यासाठी मात्र कलाकृतीतील गुणवत्तेचे सबळ पुरावे देणेकेव्हाही चांगले!